# महात्मा गांधींजी यांचे आर्थिक विचार

**रणधीर हिंदुराव शिलेवंत,** सहायक प्राध्यापक आर्टस् अंड कॉमर्स कॉलेज, नागठाणे ता.जि.सातारा.

-----------------------------------------------------------------------------------

**प्रस्तावना:**

गांधीजींचे विचार शब्दात मांडणे हे स्वतःच एक आव्हानात्मक काम आहे. महात्मा गांधींच्या विचारांचे साधेपणा आणि खोली समजून घेण्यासाठी शब्दांची कमतरता असू शकते. जागतिकीकरणाच्या या युगात शहरांची चकाकी वाढत चालली आहे, तर खेड्यातील साधेपणा लोप पावत चालला आहे. गांधीजींचे विचार आपल्याला गावातील रस्त्यांच्या साधेपणाकडे आणि स्वच्छतेकडे घेऊन जातात जिथे संध्याकाळचा आनंद असतो, ज्याची उपस्थिती आजच्या धावपळीच्या जगात गमावली आहे. महात्मा गांधींनी खेडे हे देशातील उत्पादनाचे सर्वात लहान युनिट मानले होते. महात्मा गांधी हे अध्यात्मिक पुरुष असल्याने त्यांनी अध्यात्मात पाहिलेली ग्रामरचना रामराज्याने प्रेरित होती. यामध्ये खेडी लोकशाही पद्धतीने चालवली गेली, जिथे राज्यकर्ते लोकांच्या हिताचे काम करत. सर्वांना समान संधी उपलब्ध करून देण्यात आल्या, हिंसेला जागा नव्हती आणि जिथे सर्व धर्म आणि श्रद्धा यांचा आदर केला गेला. पण गांधीजींच्या या विचारसरणीला राष्ट्रवादी हिंदू मानसिकतेशी जोडणे योग्य ठरणार नाही कारण गांधीजी त्याच वेळी म्हणायचे की “मी रामायणात असलेल्या रामावर विश्वास ठेवत नाही, मी त्या रामावर विश्वास ठेवतो जो माझ्या मनात आहे." असे परखड मत त्यांनी मांडले आहे. त्यांनी आपल्या आयुष्यात मूलभूत आशा एकादश (अकरा) व्रतचा स्वीकार केला होता. ती पुढील प्रमाणे. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचारी, अपरिग्रह, शरीरश्रम, आस्वाद, निर्भयता, सर्वधर्म समभाव, स्वदेशी, स्पर्शभावना (अस्पृश्यता त्याग) या सर्व तत्वामध्ये निर्भयता तत्वाला त्यांनी आधारभूत मानले आहे त्यांच्या मते निर्भयतेमुळेच सर्व तत्वचे पालन करता येऊ शकते. या तत्वांना आपल्या आयुष्यात वापर करून गांधीजींचा प्रवास महात्मा बनण्यापर्यंत झालेला दिसून येतो म्हणून ते असे आग्रही होते की प्रत्येक व्यक्तीने सत्य, अहिंसा यासारख्या तत्त्वाना आयुष्यात महत्त्वाचे स्थान देऊन आपले आयुष्य परिपूर्ण करावे. महात्मा गांधीजीनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यामध्ये जे भूमिका मांडली त्यामध्ये त्यांनी ज्या आर्थिक घटकांना समोर धरून जे विचार मांडले त्याच विचारांचा अभ्यास या लेखात केलेला आहे.

- **ग्राम स्वराज्य :**

महात्मा गांधींनी कल्पिलेल्या भारतामध्ये पंचायतींना स्वावलंबी बनविण्यावर भर देण्यात आला होता. गांधीजींचा विश्वास होता की भारत काही शहरांमध्ये राहत नाही तर 7 लाख खेड्यांमध्ये राहतो. स्वातंत्र्याची सुरुवात खालच्या स्तरापासून झाली पाहिजे, असे त्यांचे मत होते. 19 व्या शतकातील अनेक विद्वानांच्या लेखनात खेडी सुरळीत चालवण्याविषयी सांगितले आहे. गांधीजींनी त्याच विचारांचे पुनरुज्जीवन केले आणि ते भारतातील लोकांसमोर ठेवले. बापूंनी नवीन सिद्धांत शोधून काढले नाहीत, त्यांनी फक्त भारताच्या महान सभ्यतेची ओळख करून दिली. त्यासाठी त्यांना‘ ग्रामराज्य’ या संकल्पना मांडली त्यामध्ये त्यांनी भारतातील संपूर्ण खेड्याचा विकास कसा होईल हे सांगितले आहे. ग्राम स्वराज्य या संकल्पनेचे प्रमुख प्रणेते मानले जातात. ग्रामीण उद्योगधंद्यांचे पुनरूज्जीवन हा ग्रामोद्धाराचा प्रारंभ बिंदू म्हणता येईल. खेड्यातील लोकांचे अज्ञान, अंधश्रद्धा, आळस, दैववाद, संकुचितपणा नाहीसा करून त्यांच्या जीवनात सर्वांगीण सुधारणा घडवून आणण्याची गांधीजींची मनिषा होती. त्यासाठी त्यांनी असे म्हटले आहे की, प्रत्येक खेडे ही छोटेसे प्रजासत्ताक (Republic) आहे म्हणून प्रथम खेड्याचा विकास केला पाहिजे तरच भारताचा सर्वांगीण विकास होईल आपल्या महत्त्वाच्या

गरजाबाबतीत भारतातील प्रत्येक खेडे स्वयंपूर्ण झाले पाहिजे ते दुसऱ्या खेड्यावर अवलंबून असता काम नये त्यासाठी त्यांनी ग्राम स्वराज्याची म्हणजेच आदर्श खेड्याची संकल्पना मांडली.

1. गावांमधील वाद- विवाद सोडविण्यासाठी पंचायत असावी.
2. सर्व धर्मातील लोकांसाठी पूजा-पाठ, प्रार्थना करण्यासाठी स्वतंत्र जागा (मंदिरे, प्रार्थना) स्थळे असावीत.
3. एक सहकारी गोशाळा प्राथमिक आणि माध्यमिक शाळा असावी या ठिकाणी औद्योगिक शिक्षण व प्रशिक्षण दिले जावे.
4. गावामध्ये धर्मशाळा ही असावी जेणेकरून वाटेसरू प्रवासा दरम्यान आराम करतील.
5. गावाची रचना ही नीटनेटकी किंवा व्यवस्थित असावी.
6. गांव अन्न व वस्त्र याबाबत स्वयंपूर्ण असावे.
7. गावातील रस्ते व नाले स्वच्छ असावेत.
8. सांड पाण्याची स्वतंत्र व्यवस्था असावी.

आशा अनेक बाबी खेड्यामध्ये असाव्यात अशी अपेक्षा महात्मा गांधीजी यांनी खेड्याबाबत ठेवलेली दिसून येते शिक्षण,आरोग्य, आहार, दारिद्र्य इत्यादी. सर्वच प्रश्न गावाचे सोडवले पाहिजेत असे मत त्यांनी व्यक्त केले.

- **स्वदेशी:**

महात्मा गांधीजी यांनी स्वदेशीचा पुरस्कार करून देशातील सर्व लोकाना आव्हान केले की त्यांनी ही स्वदेशीचा स्वीकार करावा. यातून गांधीजींनी दुहेरी अस्त्राचा वापर केलेला दिसून येतो एका बाजूला ब्रिटिश सरकारला विरोध करणे व दुसऱ्या बाजूला आपल्याच देशात उद्योग-धंदा करणाऱ्या सर्वांना उत्पादन वाढीची संधी प्राप्त करून देणे. ब्रिटिशांनी भारताला कच्च्या मालाची व पक्क्या मालाची बाजारपेठ केलेली होती यावर स्वदेशीचा उपाय हाच पर्याय आहे. त्यांनी आपल्या देशातील सर्वांना आपल्याच देशात तयार होणाऱ्या वस्तूंचा वापर करावा असा आग्रह धरला आणि विदेशी कपड्यांची होळी करून ब्रिटिश सरकारला धारेवर धरले स्वदेशीचा वापर केल्यामुळे आपल्याच देशात तयार होणारा माल आपल्याच देशात विकला जाऊ शकतो आणि आपल्या देशातील उद्योग, व्यापार, शेती याचा विकास होऊ शकतो त्यामुळे देशात रोजगाराचे प्रमाण वाढून देशाचा आर्थिक विकास होऊ शकतो हे यातून स्पष्ट होते.

- **सहकारी शेतीबाबत विचार:**

ग्रामोद्योगाच्या उत्पादन क्षमतेत वाढ होण्यासाठी लोकांमध्ये सहकाराची वृत्ती निर्माण झाल्यास श्रम विभागाला भरपूर वाव मिळेल आणि वेळेची बचत होऊन उत्पादन क्षमता वाढेल, असे गांधीजींचे म्हणणे होते. १९४२ पासून ते सामुदायिक शेतीचा विचार मांडू लागले. "माझा दृढविश्वास आहे की, आपण सहकार शेतीचा स्वीकार केल्याशिवाय आपल्याला शेतीचे संपूर्ण फायदे मिळवता येणार नाहीत. खेड्यातील शंभर कुटुंबांनी जमिनीचे शंभर तुकडे करण्यापेक्षा सर्वांनी एकत्रितपणे जमिनीची लागवड करून तिच्या वरील उत्पन्न वाटून घेणे हे अधिक श्रेयस्कर आहे. हे बुद्धीला पटण्यासारखे नाही का? जो नियम जमिनीला तोच भांडवलालाही लागू पडतो." गांधीजींचा आदर्शवाद म्हणावा की, भोळेपणा की, निष्पाप मत म्हणावे, हे सांगता येणार नाही. परंतु, गेल्या १५-२० वर्षांतील शेतीची-शेतकऱ्यांची परवड, शेतकरी आत्महत्या, शेतात घुसलेली कारखानदारी आणि त्यातून आलेले राजकीय कारखानदार हे सगळं पाहता गांधीजींच्या या सहकारी शेतीच्या सल्ल्यावर विचार व्हायला पाहिजे होता, असे वाटायला लागते. आज सर्व शेतकर्यांची अशी परिस्थिती झाली आहे की शेतीतील उत्पन्न कमी, उत्पातन खर्च जास्त त्यामुळे शेती परवडत नाही त्यामुळे अनेक शेतकऱ्याना आपला जीवनावाश्क

खर्च ही करत येत नाही. शेतकऱ्याच्या दारिद्र्यात वाढ झाली आहे त्यातून जर समृद्धीकडे जायचा असेल तर गांधीजींनी सांगितलेल्या सहकारी शेतीकडे जावे लागेल.

- **अर्थशास्त्र व नितीशास्त्र:**

जागतिकीकरणाच्या या युगात मानवी जीवनमानात बदल झाले आहेत. आजच्या वातावरणात गांधीजींचे विचार हरवत चालले आहेत आणि त्यांच्या प्रासंगिकतेवर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. गांधीजी म्हणाले की "आर्थिक बाजू आणि नैतिक बाजू एकमेकांना पूरक आहेत, म्हणजेच आर्थिक स्पर्धेत आपण आपली नैतिकता विसरता कामा नये कारण निसर्गाचे नियम निरपेक्ष सत्य आहेत, परंतु आर्थिक नियम काळानुसार बदलत राहतात." भारतातील सर्व समस्यांचे समाधान 'अहिंसे' मध्ये दडलेले आहे, असे गांधीजींचे मत होते. गांधीजी भांडवलशाहीच्या विरोधात होते. ते म्हणाले की, "मानवी गरजेनुसार या पृथ्वीवर विपुल संसाधने उपलब्ध आहेत, परंतु मानवी इच्छेनुसार संसाधने नाहीत". मानवाने आपल्या गरजेनुसार वस्तूंचा वापर केला तर या जगात कोणीही उपाशी मरणार नाही. गांधीजी द्वेष आणि शोषणाच्या विरोधात असलेल्या सर्व अहिंसक उपजीविकेच्या समर्थनात होते.

- **आर्थिक निकषांवर समानता:**

आपल्या देशातील आत्यंतिक आर्थिक विषमतेवर आघात करून समतेचा पाठपुरावा करणारे गांधीजी एक लोकाभिमुख वृत्तीचे राजकीय पुढारी होते. श्रीमंत आणि गरीब, बुद्धिजीवी आणि श्रमजीवी यांच्यातील आर्थिक विषमता त्यांना अनर्थकारक वाटत होती. या देशातील सामान्य जनता नेहमी अर्धपोटी असल्यामुळे या विषमतेला अधिकच निर्घृण स्वरूप आले होते. विषमतेवर आधारलेला समाज हा कधीही अहिंसक राहू शकत नाही, अशी गांधीजींची धारणा होती आणि म्हणूनच आर्थिक विषमता कमी करण्यावर त्यांनी भर दिला. ‘‘आर्थिक समतेसाठी झटणे, याचा अर्थ भांडवल आणि श्रम यांच्यातील अनादी विरोध नाहीसा करणे’’ हा होय. ज्या थोड्या धनिकांच्या हातात आज देशाची संपत्ती गोळा झालेली आहे, त्याची पातळी खाली आणणे आणि अत्यंत हलाखीत दिवस कंठणाऱ्या जनतेची पातळी उंचावणे हाच त्याचा मार्ग होय.’’ श्रीमंत आणि गरीब यांच्याप्रमाणे श्रमजीवी व बुद्धी वर्गातील आर्थिक तफावतही त्यांच्या दृष्टीने धोक्याची होती.देशाच्या सर्वांगीण आणि समतोल विकासासाठी गरीब आणि श्रीमंत यामधील दरी कमी केली पाहिजे आनेथा स्वातंत्र्याचा काहीही उपयोग होणार नाही.

- **विकेंद्रित विकास व सर्वसमावेशक विकास**:

गांधीजी विकेंद्रित उद्योगांच्या बाजूने होते. औद्योगिकीकरण ही सर्व सामाजिक राक्षसांची जननी आहे, असे त्यांचे मत होते. गांधीजींनी विकेंद्रित उद्योगांना पाठिंबा दिला कारण त्यांचा असा विश्वास होता की विकेंद्रित उद्योगांमध्ये शोषण होणार नाही. भारत हा श्रमप्रधान देश असल्याने आणि त्याकाळी भांडवलाची कमतरता असल्याने श्रमप्रधान तंत्राचा वापर केला पाहिजे. ही तत्त्वे आजच्या काळात समर्पक वाटत नाहीत, पण भारतामध्ये बेरोजगारी आणि उपासमार मोठ्या प्रमाणावर होती तेव्हाची गोष्ट होती. त्यावेळच्या परिस्थितीचा अंदाज यावरून लावता येतो की, सर्वांना अन्न उपलब्ध व्हावे म्हणून भारताच्या पंतप्रधानांनी नागरिकांना आठवड्यातून एकदा उपवास करण्याचा सल्ला दिला होता. यासोबतच भारतातील बेरोजगारी पाहता खादी ग्रामोद्योगाला चालना देण्याबाबतही त्यांनी सांगितले. "खादी हे कापड नाही, खादी ही एक कल्पना आहे" असे गांधीजी म्हणायचे. गांधीजींनी खादीला भारताच्या आर्थिक स्वातंत्र्याचे आणि एकतेचे प्रतीक मानले. खादी उद्योगाला चालना देण्यामागे गांधीजींचे तर्क होते की खादी उद्योग भारतातील सर्व लोकांना रोजगार देऊ शकतो

आणि भारताला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र राष्ट्र बनवू शकतो. म्हणूनच गांधीजींनी चरखा हे साधन म्हणून निवडले जे स्वस्त, कमी भांडवल असलेले आणि सर्व घरांमध्ये सहज वापरता येईल. चरख्याचे जसे गांधीजींनी केले तसे उत्पादनाच्या कोणत्याही साधनाचे समाजवादी चित्र कोणत्याही नेत्याने दिलेले नाही. गांधीजी चरखाद्वारे सर्व प्रकारचे भेदभाव संपविण्याविषयी बोलतात. ते एके ठिकाणी लिहितात, ‘‘काम असे असले पाहिजे की अशिक्षित आणि सुशिक्षित, चांगले आणि वाईट, मुलगा आणि वृद्ध, स्त्री-पुरुष, मुले-मुली, दुर्बल आणि बलवान - जात-धर्माचा विचार न करता - काम करू शकतील. चरखा ही एकमेव अशी वस्तू आहे ज्यामध्ये हे सर्व गुण आहेत. म्हणूनच जो कोणी स्त्री किंवा पुरुष दररोज अर्धा तास चरख्यावर काततो, तो समाजाची यथाशक्ती सेवा करत असतो. त्याचवेळी त्यांनी 'स्वराज्याकडे फिरू'चा नाराही दिला. भारतातील प्रत्येक घराला उत्पादनाच्या युनिटमध्ये रूपांतरित करणे हा गांधीजींचा उद्देश होता. यामुळे भारत एक स्वयंपूर्ण राष्ट्र तसेच संपूर्ण जगाचे उत्पादन केंद्र बनू शकेल. गांधीजींनी यंत्राकडे 'सर्वोच्च क्रमाचे पाप' म्हणून पाहिले. गांधीजींचा असा विश्वास होता की मोठ्या प्रमाणावर मशीन्सचा वापर हे भारतातील बेरोजगारीचे मुख्य कारण आहे तसेच समाजात अस्थिरता निर्माण करेल, जे आजच्या वातावरणात आपण पाहू शकतो. सद्यपरिस्थिती लक्षात घेऊन या सर्व कल्पना समजून घेण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे आहे. गांधीजींना भारताच्या आर्थिक स्वातंत्र्याची सुरुवात तळागाळापासून करायची होती, त्यासाठी गांधीजींनी ‘ग्राम सर्वोदय’चा नाराही दिला, जेणेकरून गाव स्वत:ची उन्नती करू शकेल आणि ‘सर्वोदय - सर्वांचा उदय’ ही संकल्पना मांडण्यात आली. भारतीय राज्यघटनेतील ग्रामपंचायतींची निर्मिती या विचारसरणीने प्रेरित आहे. गांधीजींचे विचार संपूर्ण जगाच्या सर्व अन्याय विरोधी लढ्याचे नेतृत्व करताना दिसतात.समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची समान संधी मिळाली पाहिजे तरच देशाचा सर्वांगीण विकास होईल.

- **सारांश :**

आजच्या परिस्थितीत महात्मा गांधीजींचे विचार आदर्शवादी जरी वाटत असले तरी ते वास्तव वादाला सोडून नाहीत कारण ग्रामविकास, आर्थिक सत्तेचे विकेंद्रीकरण, सहकारी शेती, स्वदेशी वस्तूंचा वापर, देशामध्ये आर्थिक समानता, सर्वसामावेशक विकास हे गाठण्यासाठी भारत प्रत्येक नवीन धोरणामध्ये त्याची पावले उचलत आहे पण तरीही अपेक्षित यश गाठता आलेले नाही. त्यासाठी गांधीजींनी सांगितलेल्या सत्य, अहिंसा या तत्त्वांचा प्रत्येक व्यक्तीने आपल्या आयुष्यात वापर केल्यास कोणत्याही समस्या निर्माण होणार नाहीत. मनुष्य जातीचा सर्वांगीण विकास होईल म्हणजेच विश्वाच्या कल्याणचा एकाच मार्ग दिसून येतो तो म्हणजे गांधीवाद होय.

- **संदर्भ ग्रंथ:**

1. डॉ. जे.एफ.पाटील : महात्मा गांधी आर्थिक विचार, फडके प्रकाशन , जुलै 2021
2. डॉ. जे.एस .पाटील, डॉ. जे.एफ.पाटील : महात्मा गांधी आर्थिक विचार व आजची परिस्थिति, शिक्षणमहर्षी बापूजी साळुंखे महाविद्यालय, कराड प्रकाशक, ऑक्टोबर 2015
3. डॉ.बी.डी. कुलकर्णी, डॉ. एस.व्ही. ढमढेरे : आर्थिक विचार व विचारवंत, डायमंड पब्लिकेशन पुणे, 2008
4. अर्थसंवाद (जाने- मार्च 2006)
5.https://www.mkgandhi.org/ebks/marathi/Mind_of_Mahatma_Gandhi.pdf